अकोला पोलीस दल

**'प्रेसनोट'**

**www.akolapolice.gov.in** दिनांक ३०.०८.२०२५

---

## ऑपरेशन प्रहार अंतर्गत कार्यवाही मध्ये हिवरखेड पोलीसांनी ०६ गोवंशाना दिले जिवनदान चार चाकी बोलेरो पिकअप गाडी जप्त करून आरोपीस केले अटक

मा.श्री.अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्ह्यामध्ये अवैध्य धंदयाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहिम राबविण्यात आली.

पोलीस स्टेशन हिवरखेड येथे दिनांक ३०.०८.२०२५ रोजी रात्री दरम्यान फिर्यादी पोहेकॉ प्रमोद चव्हाण ब.न. १९१७ पोलीस स्टेशन हिवरखेड जि.अकोला यांना गुप्त बातमी दारामार्फत खबर मिळाली की,रात्री दरम्यान धोंडा आखर गावाकडुन कडुन अडगाव बु कडे आरोपी हे काही गोवंश जातीचे जनावरे कत्तलीकरीता बोलेरो चारचाकी वाहानामध्ये घेवुन जात आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन फिर्यादी व पोस्टाफ यांनी नाकाबंदी केली असता यातील आरोपी नामे नदीम खान उर्फ राजा दस्तगीर खान वय ४० वर्ष रा. अडगाव बु हा चारचाकी बोलेरो पिकअप मालवाहु वाहन क्रमांक एम. एच.२७.बि.डी.२२७८ मध्ये एकुण ०६ गोवंश जातीचे जनावरे कोंबुन कत्तलीकरीता घेवुन जातांना मिळुन आल्याने एकुण ०६ गोवंश जातीचे जनावरे किंमत १,१०,०००/- रु तसेच वाहन क्रमांक एम.एच.२७.बि.डी.२२७८ किंमत ६,५०,०००/- रु असा एकुण ७,७०,०००/- रुपयाचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त केला व गोवंश जातीचे जनावरे सुरक्षा व देखभाल कामी गौरक्षण संस्था अकोट येथे रवाना करण्यात आले.फिर्यादी पोहेकॉ प्रमोद चव्हाण ब.न.१९१७ पोलीस स्टेशन हिवरखेड यांनी दिलेल्या लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन हिवरखेड जि.अकोला येथे अपराध क्रमांक २४४/२०२५ कलम ५,५(अ),९,९(अ) प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम ११ प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.सदर गुन्हयातील आरोपी नामे नदीम खान उर्फ राजा दस्तगीर खान वय ४० वर्ष रा.अडगाव बु यास अटक करून पुढील तपास पोहेकॉ योगेश इंगळे ब.न.६७९ पोलीस स्टेशन हिवरखेड हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक, श्री.अर्चित चांडक साहेब तसेच मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री.रेड्डी सा., मा.सहा.पोलीस अधीक्षक श्री.निखील पाटील साहेब अकोट,यांचे मार्गदर्शनाखाली हिवरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन राठोड,पोहेकॉ प्रमोद चव्हाण,योगेश इंगळे,पोहेकॉ प्रफुल पवार,पोहेकॉ दिपक ढोले यांनी केली.

पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी
अकोला जिल्हा पोलीस दल

प्रति,

संपादक ,दैनिक--------

कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner